## <u>निकाल</u>

**(घोषित द्वारा – श्रीमती. संध्या बारलिंगे, सदस्या)**

तक्रारदार यांनी कलम 12 ग्राहक संरक्षण कायदा 1986 नुसार सदर तक्रार ग्राहक मंचामध्ये दाखल केली आहे.

तक्रारदार हे व्यवसायाने डॉक्टर आहे. गैरअर्जदार ही विद्‌युत वितरण करणारी कंपनी आहे. तक्रारदार गैरअर्जदाराचे ग्राहक आहेत. Maharashtra electricity regulatory commission ही संस्था विद्‌युत पुरवठ्याच्या श्रेणी नुसार terrif ठरवते. त्यानुसार ग्राहकाला विद्‌युत बिल भरावे लागते. MERC ने ठरवलेले tariff गैरअर्जदारावर बंधन कारक राहते. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, शालेय संस्था, रुग्णालय, दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्र

आणि pathology laboratory इ. प्रतिष्ठाने 'public services' या श्रेणीमध्ये मोडतात. सदर आदेशानुसार, वरील संस्थांची LT-X (public services) या श्रेणीत गणना केली व त्यानुसार tariff ची आकारणी 1 ऑगस्ट 2012 पासून लागू करण्यात यावी, असा आदेश MERC ने पारित केला. असा आदेश असताना देखिल गैर अर्जदाराने तक्रारदाराच्या हॉस्पिटलच्या विद्युत बिलाची आकारणी जुन्या tariff नुसार, LT-II ( commercial category ) नुसार करून ऑगस्ट 2012 ते august 2014 चे बिल दिलेले आहे. तक्रारदाराने वेळोवेळी बिल भरलेले आहे. ऑगस्ट 2014 नंतर तक्रारदाराच्या विद्युत बिलाची आकारणी LT-X (C ) प्रमाणे केली. परंतु नियमांनुसार 1 ऑगस्ट 2012 पासूनच तक्रारदाराची ग्राहक श्रेणी LT-II च्या ऐवजी LT-X करणे गरजेचे होते. गैरअर्जदाराने दिलेल्या सेवेतील त्रुटीमुळे तक्रारदारास जास्तीची रक्कम द्यावी लागली. तक्रारदाराने ऑगस्ट 2012 ते ऑगस्ट 2014 पर्यन्त LT-II च्या tariff नुसार विद्युत बिल भरले आहे. LT-X प्रमाणे रु. 8.24 per unit ही आकारणी आहे तर LT-II नुसार रु.10.91 पैसे per unit याप्रमाणे आकारणी आहे. गैरअर्जदाराने ऑगस्ट 2012 ते ऑगस्ट 2014 पर्यन्त तक्रारदाराच्या विद्युत बिलाची आकारणी नवीन नियमाप्रमाणे न करता जुन्या नियमांनुसार LT-II च्या tariff प्रमाणे आकारणी करून विद्युत बिल दिले आणि तक्रारदाराने ती सर्व विद्युत बिले भरलेली आहेत. अशा प्रकारे ऑगस्ट 2012 ते ऑगस्ट 2014 पर्यन्त तक्रारदाराने जास्तीची रक्कम रु.6,11,448/- विद्युत बिलापोटी भरली आहेत. तसेच गैरअर्जदाराने additional charges आणि demand charges च्या नावाखाली रु.15933/- अधिकचे घेतले आहे. तक्रारदाराने त्याची ग्राहक श्रेणी बदलून मिळावी याकरिता गैरअर्जदाराकडे दि. 23/7/14 रोजी अर्ज केला. त्यानुसार तक्रारदाराची ग्राहक श्रेणी बदलून LT-X करून दिली. परंतु तक्रारदाराने पूर्वी भरलेली फरकाची रक्कम refund केली नाही. त्यामुळे तक्रारदाराने विद्युत बिलाच्या फरकाची रक्कम, त्याला परत मिळावी व नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी केली आहे.

गैरअर्जदारास नोटिस मिळून ही तो गैरहजर राहिल्यामुळे त्यांच्या विरुद्ध एकतर्फा आदेश पारित करण्यात आला.

तक्रारदाराने जुलै 2012 ते सप्टेंबर 2014 पर्यंतचे विद्युत बिल व MERC ने पारित केलेला supplemental order च्या प्रती दाखल केल्या आहेत.

आम्ही तक्रारदाराचा युक्तिवाद ऐकला आणि दाखल केलेल्या कागदपत्र यांचे अवलोकन केले.

तक्रारदाराने जुलै 2012 ते सप्टेंबर 2014 पर्यंतची विद्युत बिले दाखल केली आहेत. जुलै 2012 ते जुलै 2014 पर्यन्त तक्रारदाराच्या विद्युत बिलाच्या tariff ची श्रेणी LT-

II C असल्याचे दिसून येत आहे. तक्रारदाराने सप्टेंबर 2014 चे duplicate bill दाखल केले आहे. त्यामध्ये tariff category LT-XC असल्याचे दिसून येते. याचा अर्थ, ऑगस्ट 2014 मध्ये tariff category बदलली आहे. तक्रारदाराचा विद्युत वापराचा load above 50 KW असल्यामुळे LT-XC ही श्रेणी लागू केलेली आहे. विद्युत बिलामध्ये 'public services' अशीही नोंद आहे. तक्रारदाराने MERC ने पारित केलेल्या supplement order ची प्रत सादर केलेली आहे. त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, मा. हायकोर्टाच्या आदेशानुसार, public services अंतर्गत येणाऱ्या संस्थांकरिता बदलेलली tariff category 1 ऑगस्ट 2012 पासून लागू करण्यात यावी.

तक्रारदाराचे म्हणणे आहे की, गैरअर्जदाराने नियमाप्रमाणे त्याच्या बिलामधील tariff category बदलली परंतु त्याआधी 1 ऑगस्ट 2012 ते ऑगस्ट 2014 पर्यन्त LT-II C प्रमाणे वसूल केलेली अतिरिक्त विद्युत बिलाची रक्कम परत केली नाही. तक्रारदाराने दाखल केलेल्या विद्युत बिलाच्या मागील बाजुस tariff effective from 01/08/12 मध्ये प्रत्येक tariff category ची per unit रक्कम दिलेली आहे. त्यानुसार LT II C commercial) च्या रकान्यात per unit रु.10. 91 पैसे आणि LT-X C (public services) च्या रकान्यात per unit रि.8.24 पैसे असे नमूद केल्याचे दिसून येत आहे. याचाच अर्थ, गैरअर्जदाराने तक्रारदाराकडून ऑगस्ट 2012 ते ऑगस्ट 2014 पर्यन्त रु. 8.24 पैसे per unit प्रमाणे विद्युत बिलाची आकारणी करण्याऐवजी रु.10.91 पैसे प्रमाणे विद्युत बिलाची आकारणी केली व त्याप्रमाणे दिलेले विद्युत बिल तक्रारदाराने भरले आहे. सप्टेंबर 2014 मध्ये तक्रारदाराच्या विनंती नुसार tariff category बदलली परंतु तक्रारदाराने पूर्वी भरलेल्या विद्युत बिलांच्या रकमेतून फरकाची अतिरिक्त रक्कम त्याला refund केली नाही.

तक्रारदाराने तक्रारीमध्ये ऑगस्ट 2012 ते ऑगस्ट 2014 पर्यन्त प्रत्येक महिन्याची, LT-II नुसार भरलेली विद्युत बिलाची रक्कम आणि LT-X नुसार होणारी विद्युत बिलाची रक्कम आणि त्या दोन्ही रकमेतील फरकाची रक्कम याचा ताळेबंद सादर केला आहे. त्यानुसार सदर रक्कम रु.6,11,448.59 पैसे इतकी येते. ती रक्कम गैरअर्जदाराने देणे आवश्यक होते. परंतु गैरअर्जदाराने सदर रक्कम परत न करून सेवेमध्ये त्रुटी दिली आहे.

वरील कारणामुळे हा मंच खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

1) गैरअर्जदाराने या आदेशाची प्रत मिळाल्यानंतर 30 दिवसाच्या आत, तक्रारदारास त्याने ऑगस्ट 2012 ते ऑगस्ट 2014 पर्यन्त LT-II C नुसार भरलेली विद्युत बिलामधील

अधिकची फरकाची रक्कम रु.6,11,448.59 पैसे, दि. 1 ऑगस्ट, 2012 पासुन 8% व्याजासह बँक DD च्या स्वरुपात परत करावी.

2) गैरअर्जदाराने या आदेशाची प्रत मिळाल्यानंतर 30 दिवसाच्या आत, तक्रारदारास नुकसान भरपाईपोटी रु.10,000/- बँक DD च्या स्वरुपात दयावे.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत/-<br>(श्रीमती एस.एस.बारलिंगे)<br>सदस्या | स्वाक्षरीत/-<br>(श्री.के.आर.ठोले)<br>सदस्य | स्वाक्षरीत/-<br>(श्री.के.एन.तुंगार)<br>अध्यक्ष |

प्रमाणित प्रत

फ्री कॉपी

17/7/2015

प्रबंधक

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच,

औरंगाबाद

PNA Legal Associates
(Experts Electricity Law)
Pavan P. Uttarwar (9890478826)
Smita Zarkar (9372331794)
Trupti Waghmare (9890391958)
Kailas Patil (989080448)